

Rajiv Gandhi Mahavidyalaya, Mudkhed & SRTM University jointly Organized

# One day Interdisciplinary National Conference on

# साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे

## व्यक्तित्व, साहित्य आणि तत्त्वज्ञान

**1st October, 2019**

(5) 2018-2019




Organized By:

**Department of Marathi**

Shri Sharda Bhavan Education Society's

**Rajiv Gandhi Mahavidyalaya,**
**Mudkhed, Dist. Nanded-**
**Maharashtra -India**

Edited by

Dr Ramesh Kadam

Dr Madhav G. Baswante

Mr Sandeep Korde

# अनुक्रमणिका

१. तमाशा कलावंतांच्या जीवनाचा आरसा : वैजयंता- प्रा. डॉ. विद्यादेवी कांबळे १

२. अण्णा भाऊ साठेच्या कादंबरीतील बंडखोर स्त्रीपात्र : आवडी - डॉ.मुक्ता निवृत्ती बिरादार ३

३. अण्णा भाऊ साठे यांच्या 'फकिरा' या कादंबरीच्या पूर्वार्धातील व्यक्तिरेखांचा चिकित्सक अभ्यास
- डॉ. शारदा विजय निवाते ६

४. अण्णा भाऊ साठे यांच्या वाङ्मयातील स्त्री प्रतिमा- अनिता नामदेवराव रानवळकर १०

५. अण्णा भाऊ साठे आणि कम्युनिष्ट चळवळ- डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे १२

६. अण्णा भाऊ साठे यांच्या शाहिरी वाङ्मयातून घडणारे मुंबई आणि महाराष्ट्राचे दर्शन :
एक आकलन- डॉ.मारोती दशरथ कसाब १६

७. अण्णा भाऊ साठे यांच्या वाङ्.मयातील स्त्री प्रतिमा- मिनाक्षी भोजराज गोणारकर २२

८. अण्णा भाऊ साठे यांचे सामाजिक विचार : एक समाजशास्त्रीय अध्ययन- प्रा.डॉ.कांबळे भरत मसाजी २४

९. अण्णा भाऊ साठे : जीवन, साहित्य आणि तत्वज्ञान-प्रा.डॉ.बाबुराव लक्ष्मणराव घायाळ २६

१०. अण्णा भाऊ आणि संयुक्त महाराष्ट्र-डॉ. नवनाथ गोरे २८

११. अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यातील स्त्री प्रतिमा-उपप्राचार्य प्रा. नागनाथ करडे ३१

१२. अण्णा भाऊ साठे : विद्रोही साहित्याचे जनक-प्रा. मोरे पंडित किशनराव ३४

१३. अण्णा भाऊच्या कांदबरीतील ग्रामजीवन (फकिरा व आवडी)-डॉ. संजय जगताप ३६

१४. अण्णा भाऊ साठे वाङ्मयातील स्त्री प्रतिमा- प्रा. डॉ. दिलीप सावंत ३८

१५. विषमतेविरुद्धचा एल्गार : अण्णा भाऊंची कविता जग बदल घालुनी घाव-प्रा.डॉ.सुशीलप्रकाश चिमोरे ४१

१६. साम्यवादी विचारवंत अण्णा भाऊ साठे-प्रा. डॉ. दत्ताजी हुलप्पा मेहत्रे ४४

१७. अण्णा भाऊ साठे आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ-प्रा. डॉ. संजय भाऊराव गिरे ४६

१८. अण्णा भाऊ साठे यांचे कथाविश्व-डॉ. आसाराम भगवानराव तोंडे ४९

१९. अण्णा भाऊं साठे यांचे पोवाडे-प्रा.डॉ.साहेबराव भानुदासराव शिंदे ५३

२०. अण्णा भाऊ साठे : एक प्रतिभासंपन्न साहित्यिक-प्रा.डॉ. राजेश धनजकर ५६

२१. साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या वाडयमयातील स्त्री प्रतिमा-लखन दिगांबर कत्तेवार ५९

२२. अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यातील विद्रोही 'स्त्री' पात्रे-प्रा.डॉ.मधुकर बैकरे ६२

ISBN : 978-81-922248-7-9

२३. अण्णा भाऊ साठे यांच्या 'फकिरा' कादंबरीतील मानवतावादी तत्त्वज्ञान-प्रा. सौ.बेटकर व्ही. सी. ६५

२४. अण्णा भाऊ साठे यांचे साहित्यलेखनविषयक विचार-प्रा.डॉ.खुशाल पांडुरंग वाघमारे ६७

२५. अण्णा भाऊ साठे यांच्या निवडक कादंबऱ्यातील स्त्री प्रतिमा-प्रा. सविता कोकाटे परांडे ६९

२६. अण्णा भाऊ साठे यांची लेखनशैली-प्रा. केदार रविंद्र केंद्रेकर ७२

२७. अण्णा भाऊ साठे यांच्या वाङ्मयातील स्त्री प्रतिमा-स्वाती रखमाजी बोढरे ७५

२८. साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या समग्र साहित्याचे स्वरुप आणि विशेष :
एक अभ्यास-प्रा.संजय नामदेवराव आठवले ७७

२९. अण्णा भाऊ साठे यांच्या 'फकिरा' कादंबरीतील जीवनसंघर्ष -डॉ. संभाजी शिवाजी जाधव ८१

३०. अण्णा भाऊ साठेंचे कथाविश्व- प्रा.डॉ.संतोष विष्णू चतुर ८४

३१. अण्णा भाऊ साठे यांची लेखनशैली-संतोष रघुनाथ कांबळे ८७

३२. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील मानवतावाद-प्रा.डॉ.वनमाला लोंढे ८९

३३. अण्णा भाऊ साठे यांच्या कथेतील पुरुषप्रधान संस्कृतीविरुद्ध लढणारी विद्रोही स्त्री-डॉ.विष्णू काळबा कांबळे ९१

३४. अण्णा भाऊ साठे यांचे कथाविश्व-डॉ.अलका प्रदीप वालचाळे (सरोदे) ९६

३५. अण्णा भाऊ साठे यांचे कथाविश्व- दगडूबा कोंडीबा माघाडे,प्रा.डॉ.अशोक पाठक ९९

३६. अण्णा भाऊ साठे यांच्या कथेतील सामाजिक जाणिवा- साबळे पल्लवी भगवान १०१

३७. माकडीचा माळ कादंबरीचे सामाजिक आकलन-प्रा.डॉ.अतुल नारायण चौरे १०३

३८. अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीविश्वातील समाजजीवन-सिद्धार्थ बाबुराव नवतुरे १०६

३९. अण्णा भाऊ साठे यांच्या कथेतील सामाजिक तत्वज्ञान-गायत्री आनंद भरनाळे १०८

४०. अण्णा भाऊ साठे : एक सिद्धहस्त कथाकार-प्रा. डॉ. नामदेव सोडगीर ११२

४१. जग बदलाचा महान मंत्र आणि आंबेडकरी क्रांतीसूत्रे-डॉ. कीर्तीकुमार मोरे ११७

४२. साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे व्यक्तित्व, साहित्य आणि तत्वज्ञान-प्रवीण शंकर सोलनकर १२२

४३. साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे समग्र साहित्य-कु. स्नेहा नरेशराव ढागे १२६

४४. अण्णा भाऊ साठे आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ-पालंचेवार पोतन्ना गंगन्ना १३०

४५. अण्णा भाऊ साठे यांचे सामाजिक विचार-डॉ.लक्ष्मण एस.पवार १३३

४६. साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे : व्यक्तित्व,साहित्य आणि तत्वज्ञान - डॉ. शिवाजी सोमला पवार १३५

४७. जनमाणसातील लेखक : अण्णा भाऊ साठे-प्रा.कांबळे डी.आर. १३९

ISBN : 978-81-922248-7-9

# अण्णा भाऊ साठे : एक प्रतिभासंपन्न साहित्यिक

**प्रा.डॉ. राजेश धनजकर**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड
ता. गंगाखेड जि.परभणी

मातंग समाजात जन्माला आलेलं एक क्रांतिकारी व्यक्तिमत्व म्हणजे अण्णा भाऊसाठे होत. १ ऑगस्ट १९२० रोजी अण्णाभाऊंचा जन्म वाटेगावच्या बकाल वस्तीतील मातंग वाड्यात झाला. अण्णांचा जन्म होण्यापूर्वी व जन्मानंतर त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती अतिशय नाजूक होती. त्यामुळे अण्णांचे बालपण हे अत्यंत धकाधकीत गेले. तुटपुंज्या उत्पन्नातून साठे कुटुंबियांची उपासमार होऊ लागली. साठे कुटुंबियाबरोबरच त्या काळी अख्ख्या मातंग वाड्यालाच भूक - भाकर, दुष्काळ, दारिद्रय, अज्ञान, अंधश्रध्देने घेरले होते. जिथं चटणी - भाकरीची गरज पूर्ण होत नाही, तिथे शिक्षण घेऊन सुसंस्कृत होणं तर दूरच !तरीही अण्णा भाऊदिड दिवस शाळेत गेलेच. त्यानंतर मात्र त्यांनी कधीच शाळेचे व शिक्षकाचे तोंड पाहिले नाही.

अलीकडे मात्र अण्णाभाऊंच्या शिक्षणाच्या संदर्भात अनेक मतप्रवाह दिसून येतात. काहींच्या मते, अण्णाभाऊंनी चौथीपर्यंत शिक्षण घेतले, तर काही जण त्यांना सातवीच्या वर्गात नेऊन बसवतात. पण वस्तुस्थिती अशी आहे की, अण्णांच्या शिक्षणाच्या बाबतीत अजून तरी निश्चित असा पुरावा उपलब्ध झाला नाही. ज्यांच्या घरी अक्षरांचा वारसाच नाही. अक्षरे कशाला म्हणतात याचे ज्याला ज्ञान नाही. जो शाळेत जाऊन अक्षरे शिकला नाही. अक्षरांशी ज्याची साधी तोंडओळखही नाही. असा भारतीय संस्कृतीतील खालच्या थराचा माणूस आपल्या बुलंद प्रतिभेनं जागतिक पातळीवर पोहोचतो. अवघ्या एकोण पन्नास वर्षात ३५ कादंबऱ्या, १३ कथासंग्रह, १३ लोकनाट्य, ३ नाटके, १ शाहिरी पुस्तक, १ प्रवास वर्णन, ७ चित्रपटकथा व १५ पोवाडे अशी एकाहून एक सरस साहित्य निर्मिती करून अण्णाभाऊंनी जगाला आचंबित केले. चार भिंतीच्या आत जरी अण्णा शिकले नसले , तरी विश्वाच्या या अफाट पसाऱ्यात मात्र त्यांना खूप काही शिकता आले.

“अण्णा भाऊसाठे यांची समग्र साहित्य संपदा मूलनिवासी कृषि संस्कृतीशी असलेले नाते स्पष्ट करते. ब्राम्हणांनी अण्णा भाऊसाठेंसारख्या संवेदनशील, प्रतिभासंपन्न, कलावंताला अक्षर ओळख न होऊ देण्याची व्यवस्था केली होती, पण या निरक्षरांनी अक्षर वाङ्मयाची निर्मिती करून मूलनिवासी बहुजन समाजाची अंगभूत क्षमता व गुणवत्ता सिध्द केली”१. विद्वतेचा आव आणणाऱ्या प्रस्थापित व्यवस्थेला ही फार मोठा चपराक होती. यासाठी अण्णाभाऊंनी आपल्या कथा - कादंबऱ्याचे नायक हे समाज व्यवस्थेतल्या खालच्या स्तरातील माणसे निवडली. नुसती निवडली नाहीत, तर त्यांचा स्वाभिमान व लढवय्या बाणादेखील तेवढ्याच ताकदीने रेखाटला. त्यांच्यात आशावाद निर्माण करून जीवन जगण्याची जिद्दही निर्माण केली. मराठी कथा वाङ्मयाच्या प्रांतात न फिरकलेला माणूस अण्णांनी आपल्या कथेचा नायक केला आणि म्हणूनच महार, मातंग व रामोशी आदी जातीतील लोक अण्णांच्या कथांचे नायक झाले. या संदर्भात वि.दा. करंदीकर म्हणतात, “अनुकूल परिस्थितीत आम्ही जोपासलेली निष्क्रियता आणि प्रतिकूल परिस्थितीत अण्णा भाऊसाठे यांनी निर्माण केलेली साहित्यनिर्मिती समोरा समोर उभी ठाकली की पृथ्वीच्या पोटात गडप व्हावे वाटते”२.

अण्णा भाऊसाठे हे कांदबरीकार, कथाकार, नाटककार व शाहीरच नव्हते, तर ते साहित्याच्या सर्वच क्षेत्रातील एक कीर्तिसंपन्न साहित्यिक होते. समाजजीवनातील वास्तव दर्शन अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातून प्रभाविपणे मांडले. या देशातील शेतकरी, कष्टकरी, कामगार, दलित, श्रमिक व उपेक्षित वर्गात क्रांती झाली पाहिजे, या भूमिकेतूनच अण्णांनी आपली लेखणी चालवली. “दलित माणसाला तू जगाचा राजा असून, तू जग बदलवणारा क्रांतिपुरूष आहेस. तूच या जगाचा निर्माता आणि पालनकर्ता आहेस असा संदेश देऊन अण्णाभाऊंनी श्रमिक माणसांना प्रतिष्ठा दिली”.३
या देशातल्या श्रमिक व कष्टकरी माणसाला ‘स्व’ ची जाणीव करून दिली ती कथेच्या माध्यमातून आणि म्हणूनच त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदूच मुळात या देशातला संबंध बहूजन समाज होता. त्यांचे दु:ख, दारिद्रय, व्यथा व वेदनेवर फुंकर घालण्याचे काम अण्णांच्या साहित्याने केले. भूक आणि भाकरीसाठी तडफडणाऱ्या माणसांसाठी अण्णांनी आपली लेखणी झिजवली, तिला वैचारिक व वैज्ञानिक दृष्टी प्राप्त करून दिली. शोषणकर्ते व शासनकर्ते हेच श्रमिकांच्या विकासाआड येणारे एक नंबरचे शत्रू आहेत, हे अण्णाभाऊंच्या प्रतिभेनं हेरलं होतं. मुंबईसारख्या शहरात गरीब - श्रीमंत, शोषक - शोषित यांचं जग अण्णांनी अतिशय जवळून पाहिले. त्यामुळे त्यांच्यातला शाहीर जागा झाला.

“मुंबईत उंचावरी मलबार हिल इंद्रपुरी ।
कुबेराची वस्ती तिथं सुख भोगती ।।
परळात राहणारे रात्रंदिवस राबणारे ।
मिळेल ते खाऊनी घाम गाळती नारी ग ।।
फोरस रोड तीन बत्ती गोलपिठा नाक्यावरती ।


ISBN : 978-81-922248-7-9

शरीर विकूनी किती एक पोट भरती नारी ग ।।''४

मुंबई नगरीतील विषमतेचे दर्शन अण्णाभाऊच्या वरील 'लावणी' तून घडते.

तसं पाहिलं तर, अण्णा भाऊसाठेंचे विचारच मुळात तळागाळातील माणसाला जागे करणारे आहेत. क्रांतिसाठी प्रवृत करून समतेचा झेंडा विश्वात फडकवणारे आहेत. आणि म्हणूनच, ''उपेक्षा, अवमान, अवहेलना, शोषण, अन्याय व जुलूमांना नकार देणारा विचार अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातून उजागर केला. अन्यायाचा प्रतिकार व न्याय,स्वातंत्र्य आणि समतेचा पुरस्कार हा अण्णांच्या साहित्याचा प्राण आहे''५. श्रमिक व कामगार वर्गाच्या जीवनाला मानवतेचा चेहरा प्राप्त झाला पाहिजे, ही त्यांची भूमिका होती. विषमतेविरूध्द निकराचा लढा देऊन समता प्रस्थापित करण्यासाठी अण्णांनी क्रांतिच्या भाषेचा वापर केला. शोषित माणसाला क्रांतिची व बंडाची भाषादेखील त्यांनीच शिकवली.

अण्णा भाऊसाठेंना परिवर्तन हवं होतं आणि तेही तळागाळातल्या माणसांमध्ये. म्हणून परिवर्तनाच्या लढयात या देशातला शेतकरी, कामगार, श्रमिक व मध्यमवर्गीय माणूस सहभागी झाला पाहिजे. तेव्हाच त्याचं अस्तित्व शाबूत राहू शकेल अन्यथा नाही. शेतकरी तर हा इथला महत्वाचा घटक. रात्रंदिवस तो भूतासारखा या मातीत राबतो. तरीही त्याच्या वाट्याला दारिद्रयाशिवाय काहीच येत नाही. त्यामुळे आता शेतकऱ्यानेच हे जग बदलावे, असे आवाहन अण्णा भाऊ करतात.

''तू मराठमोळा शेतकरी, घोंगडी शिरी ।
जुनी ती काठी, जुनी लंगोटी ।।
बदल ही दुनिया सारी रे ।
चल बदल ही दुनिया सारी रे ।।''६

जगाचा हा पोशिंदा उन्हातान्हात राबराब राबतो. ऊन, वारा, पाऊस यांची तमा न बाळगता कष्टत राहतो. घामाच्या धारातून मातीची तहान भागवतो व सर्व जनतेला जगवतो. स्वतः मात्र उपाशीच राहतो.

''राबुन थंडी वाऱ्यात,
गाळशी घामाच्या धारा
लाविशी रास मोत्याची,
परी नाही तुला रे थारा
तू खाशी कांदा भाकरी बसून अंधारी
झोपेला धोंडा भूकेला कोंडा,
बदल दुनिया सारी''७

शेतकरी हा सर्व धान्यांचा निर्माता असून, स्वतः मात्र दैन्यावस्थेचे जीवन जगतो. दारिद्रय तर त्याच्या पाचविलाच पुजलेले आहे. म्हणून आता त्यानेच हे जग बदलवून टाकावे असे अण्णाभाऊंना वाटते. या देशातील विषमतावादी समाज व्यवस्थेने दलित, पीडित, शोषित, कष्टकरी, कामगार आदिंना अमानुष वागणूक देऊन पशूतुल्य जीवनाच्या गर्तेत लोटले. हिंदू संस्कृतीमधील याच महाभागांनी गुराढोरांना पुरणाच्या पोळया खाऊ घातल्या, परंतु माणसासारख्या धडधाकट माणसांवर गुरांच्या शेणातल्या दाण्याच्या भाकरी खाण्याची वेळ आणली. हजारो वर्षे या कुबट संस्कृतीने आमचे गळे दाबले आणि आम्हीही आतला आवाज आतच दाबत राहिलो. परंतु अण्णाभाऊंच्या शब्दसामर्थ्यांने मात्र आमचे गळे आता मोकळे झाले आहेत. विद्रोह ओकण्यास ते सज्ज झाले.

अण्णा भाऊसाठेंनी रशियन क्रांतीतून नाझी अत्याचाराच्या विरूध्द लढणाऱ्या सर्वसामान्य माणसांबरोबरच, तळागाळातल्या शेवटच्या माणसाचे दुःख आपल्या साहित्यात मांडून शोषितांच्या हाती सामाजिक - आर्थिक शोषणाविरूध्द लढण्याचे क्रांतिशस्त्र दिले. खालच्या स्तरातला माणूस क्रांतिसन्मुख झाला. संबंध देशातला शोषित पीडित माणूस, नागवला गेलेला व पिचलेला माणूस वैचारिक क्रांतितून व समाजप्रबोधनातून सुखी व आनंदी व्हावा यासाठी अण्णांनी आयुष्यभर आपल्या लेखणीला धार लावली. कष्टकरी माणसाच्या श्रमाला योग्य किंमत मिळाली पाहिजे, यासाठी अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातून घणाघाती शब्दांचे प्रहार केले.

ज्या बेईमान समाज - व्यवस्थेने येथील बहुजनांवर हजारो वर्षे गुलामी लादली. दुःख, दैन्य व लाचारीचे जीवन जगणे भाग पाडले, त्या वंचित समाजाच्या उत्थानासाठी अण्णाभाऊंनी अतोनात कष्ट उपसले. 'जग बदल घालुनि घाव। सांगुनी गेले मला भीमराव।।' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे सांगितले ते अण्णांनी आपल्या कृती-उक्तीत उतरविले. परंतु अण्णांनी आपल्या माणसाला व समाजाला जे काही सांगितले ते मात्र त्यांच्या गळी उतरल्याचे दिसत नाही, ही मोठी शोकांतिका आहे. मोठेपणाचा आव आणणाऱ्या प्रस्थापित संस्कृतीने ज्यांचा वर्षानुवर्ष गळा दाबून ठेवला. ज्यांना परिवर्तनाचे पोवाडे गावू दिले नाही, अंगावर दोन वस्त्रे लेवू दिले नाही, की पोटाची आग विझेल इतके अन्न मिळू दिले नाही. अशा स्वार्थी व मतलबी व्यवस्थेविरूध्द येथील भूके कंगालांनी पेटून उठावे, हातात परिवर्तनाची मशाल घ्यावी, सामाजिक - आर्थिक शोषणविरूध्द क्रांतिकारी व्हावे आणि समता प्रस्थापित करावी हाच अण्णाभाऊंचा 'क्रांतिवाद' होय.

अण्णाभाऊंच्या साहित्यातील समाजजीवनाचे चित्रण अतिशय वास्तववादी आहे. कारण ते त्या समाजाचे एक घटक होते. समाज ज्या काही व्यथा-वेदना भोगत होता, त्यातील काही भोग अण्णांच्या वाटयाला आले. आणि म्हणूनच आपल्या समाजाशी व समाजाच्या सुखदुःखाची व चांगल्या वाईट


ISBN : 978-81-922248-7-9

घटनांशी अण्णा एकरूप झाले होते. त्यामुळेच तर, अण्णाभाऊंच्या साहित्यातील बहुतांश व्यतिरेखा हया घाम गाळून व हडाचे काडं करून चटणी-भाकरी मिळवताना दिसतात. पोटाची खळगी भरण्यासाठी संघर्ष करीत राहतात. या संदर्भात मराठीतील जेष्ठ साहित्यिक व ज्ञानपीठ पुरस्कार विजेते श्री. वि.स. खांडेकर यांनी 'फकिरा' च्या प्रस्तावनेत लिहिले आहे की, ''अण्णाभाऊचे साहित्य जगण्यासाठी मरायला तयार असलेल्या व्यक्तिरेखांनी भरलेले आहे. ते स्वातंत्र्यप्रेमी आहेत. म्हणजेच, त्यांना बंड करून आपल्या भोवती असलेली बंधने तोडाविशी वाटतात''.८

अण्णाभाऊंची फकिरा ही कादंबरी ग्रामपातळीवरील संघर्षाची गाथा आहे. फकिरा हाच या कांदबरीचा नायक .गावाला समृध्दी मिळावी, यासाठी तो संघर्ष करतो. गुलामी, अपमान, अवहेलना या विरूध्द बंड करून उढणारा फकिरा हा नायक आहे, तर सावकार, जमीनदार, गुंड, डाकू हे या कांदबरीतील खलनायक आहेत. ''दुष्काळ, रोगाच्या साथी व उपासमार यात अडकलेल्या महार, मांग, रामोशी समाजाला जगविण्यासाठी धान्याची गोदामं आणि ब्रिटिशांचे खजिने लुटतो आणि गोरगरिबांना धान्य पसा-पसा वाटतो. ही त्याची न्यायीक भूमिका तरूणांपुढे आदर्श ठेवणारीच आहे. दलित पीडित समाजाची होणारी उपासमार फकिराला अस्वस्थ करते''.९ असे अनेक प्रसंग या कादंबरीत पहायला मिळतात.

अण्णाभाऊंचे साहित्य म्हणजे मनोरंजनाचा खजीना नव्हे, तर ते तळागाळातील लोकांच्या वेदनेचा हुंकार आहे. ही वेदना डोंगराएवढी नाही, तर ती पहाडाहुनही अधिक मोठी आहे. मराठी साहित्यातील रंजनात्मक साहित्याला अण्णांच्या साहित्याने फार मोठा हादरा दिला. प्रस्थापितांच्या साहित्याने ज्या माणसाला दूर लोटले, ती माणसे अण्णांनी आपल्या साहित्याच्या केंद्रस्थानी उभी केली. आणि म्हणूनच अण्णा भाऊसाठेंच्या साहित्याच्या संदर्भात असेही म्हटले जाते की, अण्णा भाऊसाठेंच्या साहित्यातून 'माणूस' जर बाद केला, तर त्यांचे साहित्य रद्दी होईल. वरील विधान हे अण्णाभाऊंच्या साहित्याला तंतोतंत लागू पडणारे आहे. कारण अण्णाभाऊंच्या साहित्याचा केंद्रबिंदूच मुळात माणूस आहे.

अण्णाभाऊंच्या कथेबद्दल सुप्रसिध्द साहित्यिक आचार्य प्र.के. अत्रे लिहितात, ''ही जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांची कथा आहे. इथल्या सर्वांच्या रक्तातून एकच लढावू ईर्षा वाहते आहे. त्या सर्वांना मानाने जगायचे आहे. अंगात असेल नसेल तेवढे बळ एकवटून त्यांना आक्रमक वृत्तीशी सामना करायचा आहे आणि त्यांना त्यात जिंकायचेही आहे. ही कच खाणारी, हार माणणारी माणसे नाहीत. वार झेलायला त्यांची छाती नेहमीच ताठयाने फुगलेली आहे. ठोसा द्यायला त्यांची मूठ नेहमीच वर उगारलेली आहे. धडक द्यायला त्यांचे मस्तक नेहमीच पुढे झुकलेले आहे''.१०

खरे तर, जीवनातले सत्य हे डोळे लाऊन दिसत नसते, तर ते उघडया डोळयाने पाहावे लागते आणि अण्णांनी ते पाहिलं आणि तसंच लिहिलं. कल्पनेचे पंख लाऊन अण्णांनी भरारी मारली नाही, तर समाजजीवनातलं वास्तव रेखाटलं .वाटेगावात जन्माला आलेल्या या प्रतिभासंपन्न साहित्यिकाने एकाहून एक सरस व दर्जेदार साहित्यनिर्मिती करून, वाट चुकलेल्या समाजाला वाटेवर आणले. यातच या महान साहित्यिकाचे मोठेपण आहे.

**संदर्भ :-**

१) प्रा.गौतम निकम 'क्रांतिकारी अण्णा भाऊसाठे' पृ.२५
२) तत्रैव
३) डॉ. माधव बसवंते, 'मातंग समाज इतिहास आणि वास्तव' पृ.१२८
४) प्रा. मिलिंद कांबळे, प्रा.डॉ. राजीव यशवंते, 'अण्णा भाऊसाठे साहित्य आणि समीक्षा' पृ. ६७
५) प्रा.गौतम निकम 'क्रांतिकारी अण्णा भाऊसाठे' पृ.२६
६) प्रा.कांबळे, डॉ. यशवंते 'अण्णा भाऊसाठे साहित्य आणि समीक्षा' पृ.६६
७) प्रा. गौतम निकम 'क्रांतिकारी अण्णा भाऊसाठे' पृ. ३०
८) डॉ. बजरंग कोरडे 'भारतीय साहित्याचे निर्माते अण्णा भाऊसाठे' पृ. ८१
९) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊसाठे निवडक वाड्मय (कादंबरी खंड - १) पृ. १७
१०) संपादक - चंद्रकांत वानखेडे 'जेव्हा मांग बोलू लागला' पृ.७३


ISBN 978-81-922248-7-9